PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Tochi Ek Samarth
Year: 2004

Song: Udhhvane Udhhar Ho Kela
Lyricist:

उद्धवाने उद्धार हो केला
माणसाचा पुण्यात्मा झाला
उद्धवाने उद्धार हो केला
माणसाचा पुण्यात्मा झाला
कर्दळीच्या वनातून
वारूळाच्या रणातून
एक दिव्य प्रकाश निघाला
उद्धवाने उद्धार हो केला
माणसाचा पुण्यात्मा झाला
उद्धवाने उद्धार हो केला
माणसाचा पुण्यात्मा झाला

आदिमातेच्या दर्शना
कलकत्ता आला
बंगाल हा चरण स्पर्शे
मंगल हो झाला
कालीमातेच्या दर्शना
कलकत्ता आला
बंगाल हा चरण स्पर्शे
मंगल हो झाला
महाकालीला पाहून
भक्तीभावाने न्हाऊन
सर्व पाप विनाशक झाला
उद्धवाने उद्धार हो केला
माणसाचा पुण्यात्मा झाला
उद्धवाने उद्धार हो केला
माणसाचा पुण्यात्मा झाला

काशीमध्ये चालत आला
पायपीट झाली
गंगा संगमी जाऊनी
वस्ती त्यानं केली
काशीमध्ये चालत आला
पायपीट झाली
गंगा संगमी जाऊनी
वस्ती त्यानं केली
ओंझळीत पाणी घेता
अमृताचा स्पर्श होता
काशीचा ही स्वर्ग ऐसा झाला
उद्धवाने उद्धार हो केला
माणसाचा पुण्यात्मा झाला
उद्धवाने उद्धार हो केला
माणसाचा पुण्यात्मा झाला

त्र्यंबकेश्वराला आला
आला काशी सोडूनी
महादेवाच्या दर्शना
उभा हात जोडूनी
त्र्यंबकेश्वराला आला
आला काशी सोडूनी
महादेवाच्या दर्शना
उभा हात जोडूनी
कीर्तनात रंगूनिया
भक्तांमध्ये दंगूनिया
तिथे महाप्रसाद मांडीला
उद्धवाने उद्धार हो केला
माणसाचा पुण्यात्मा झाला
उद्धवाने उद्धार हो केला

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*

Literacy for a Billion

माणसाचा पुण्यात्मा झाला

वाटेचा हा वाटसरू
आला कोल्हापूरी
गावकरी आग्रहानं
नेती आपुल्या घरी
वाटेचा हा वाटसरू
आला कोल्हापूरी
गावकरी आग्रहानं
नेती आपुल्या घरी
काय त्याच्या आले मना
चुकवूनी साऱ्या जना

अकस्मात पोबारा हो केला
उद्धवाने उद्धार हो केला
माणसाचा पुण्यात्मा झाला
उद्धवाने उद्धार हो केला
माणसाचा पुण्यात्मा झाला
दीर्घकाळ फिरूनिया
अक्कलकोटी आला
खंडोबाच्या मंदिरी बैसला
उद्धवाने उद्धार हो केला
माणसाचा पुण्यात्मा झाला
उद्धवाने उद्धार हो केला
माणसाचा पुण्यात्मा झाला

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*